# महात्मा जोतीराव फुले हे कृतिशील क्रांतिकारक होते; वंचित दुर्लक्षित घटकांना बार्टीच्या वतीने न्याय देऊ - धम्मज्योती गजभिये





पुणे : क्रांतिसूर्य महात्मा जोतीतिराव फुले यांनी १ जानेवारी १८४८ साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात समाजव्यवस्था चातुर्वर्ण व्यवस्थेत विभागली होती. तेव्हा सावित्रीबाई फुले व महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणाचे दार खुले केले. विधवा महिलांना त्यांनी आश्रय दिला. समाजातील अनिष्ट रूढी प्रथा परंपरा कर्मकांड यांच्यावर त्यांनी प्रहार केला. भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गुरुस्थानी मानले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताला संविधान दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी लोकांचे राज्य स्वराज्य निर्माण केले. बार्टीच्या वतीने आम्ही महापुरुषांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करू त्यांचे विचार कृतीत आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत तसेच वंचित घटकांना न्याय देऊ असे प्रतिपादन धम्मज्योती गजभिये महासंचालक बार्टी पुणे यांनी व्यक्त केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे (महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था) यांच्या वतीने -१९ च्या पार्श्वभूमीवर महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाइन पद्धतीने जयंतीचे आयोजन दिनांक ११ एप्रिल २०२१ रोजी बार्टी मुख्यालय पुणे येथे करण्यात आले. या ऑनलाईन जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी धम्मज्योती गजभिये , महासंचालक बार्टी, पुणे हे होते. या वेळी ते बोलत होते.

आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले या विषयावर पी. आर. सोनवणे, प्राध्यापक संगणक अभियांत्रिकी विभाग - पुणे यांनी ऑनलाईन स्वरूपात मार्गदर्शन केले. यावेळी ते म्हणाले की महात्मा जोतीराव फुले यांनी सर्वप्रथम समता प्रस्थापित करण्यासाठी काम केले. सामाजिक क्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले हेच आहेत. बार्टी ही संस्था कल्याणकारी राज्य राष्ट्र मधली एक महत्त्वाचा घटक आहे. अनुसूचित जाती वंचित उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्याचे काम बार्टी सातत्याने करत असते. विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण देणे व प्रशिक्षण देऊन संशोधन करणे ,समाजात समता स्थापन करण्याचे काम बार्टी करत आहे. जागतिक मानव विकास निर्देशांकाचे शिक्षण, आरोग्य, रोजगार हे मापदंड आहेत परंतु भारतीय संविधानात ह्या मापदंड यांसोबतच आणखी तीन मापदंड समाविष्ट आहेत ते म्हणजे सामाजिक न्याय, सामाजिक समता आणि सामाजिक सुरक्षा. भारतीय संविधान हे मानव विकासाचा एक सचेत दस्तावेज आहे. बार्टीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथील आयुका च्या धर्तीवर इंटर इन्स्टिट्यूट ऑर्गनायझेशन च्या माध्यमातून मानव विकास मापदंडांचे संशोधन करून अनेक बदल घडवून आणावेत. तसेच माहिती तंत्रज्ञानाचा योग्य उपयोग करून भारत एक कल्याणकारी राष्ट्र बनू शकते, असे मत व्यक्त केले. महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे जनक असल्याचे नमूद करत त्यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याला उजाळा दिला .

बार्टी मुख्यालय पुणे येथे महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या प्रतिमेला उमेश घुले, निबंधक, बार्टी, पुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. ऑनलाइन जयंती कार्यक्रमात उमेश घुले यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त शुभेच्छा व्यक्त केल्या. ऑनलाइन जयंती कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुमेध थोरात, प्रकल्प व्यवस्थापक, माहिती तंत्रज्ञान विभाग बार्टी पुणे यांनी केले. नितीन साहरे, प्रकल्प व्यवस्थापक, जात पडताळणी प्रमाणपत्र विभाग, बार्टी, पुणे यांनी झुम मीटिंग व बार्टी फेसबुक पेजवरून ऑनलाइन पद्धतीने उपस्थितांचे आभार मानले. या ऑनलाईन जयंती सोहळ्यास बार्टीतील अधिकारी-कर्मचारी, राज्यातील सर्व समतादुत, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर जॉईन होऊन या ऑनलाईन जयंती सोहळ्याचा उत्साह द्विगुणित केला. बार्टीच्या यूट्यूब चॅनलवर ह्या कार्यक्रमाचे पून:प्रक्षेपण सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आले आहे. बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांच्या मार्गदर्शनाखाली प्रथमच महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंती महोत्सवाचे आयोजन ऑनलाईन स्वरूपात करण्यात आले. या ऑनलाईन जयंती महोत्सव कार्यक्रमाला राज्यभरातून मोठा प्रतिसाद मिळाला.

# पुणे महानगरपालिकेच्या प्रभाग समित्यांवर भाजपचे निर्विवाद वर्चस्व



पुणे : पुणे शहरातील विविध प्रभाग समित्यांच्या अध्यक्ष पदाची निवडणूक झाली. पुणे शहरातील १५ पैकी १२ प्रभाग समिती अध्यक्षपदी भारतीय जनता पार्टीचे नगरसेवक निवडून आले आहेत. या निवडणुकांमधून पुणे शहरातील भारतीय जनता पार्टीचे वर्चस्व पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. या सर्व नवनिर्वाचित प्रभाग समिती अध्यक्षांचे पुणे महानगरपालिकेमध्ये अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्याला शुभेच्छा देण्यात आल्या. पुणे शहरातील नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी आपल्याला मिळालेल्या संधीचा सर्व अध्यक्ष कसोशीने आणि कौशल्याने वापर करतील असा विश्वास पुणे शहर अध्यक्ष जगदीश मुळीक यांनी व्यक्त केला. याप्रसंगी पुणे शहर अध्यक्ष जगदीश मुळीक, महापौर मुरलीधर मोहोळ, सभागृह नेते गणेश बिडकर व सर्व नवनिर्वाचित प्रभाग अध्यक्ष उपस्थित होते.

# बार्टीतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

## बार्टी वंचित घटकांना न्याय देण्याचे काम करणार-धम्मज्योती गजभिये





पुणे(प्रतिनिधी)-डॉ बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते होते, असा अपप्रचार करण्यात आला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील सर्वांसाठी काम केले. मी प्रथम माझ्या देशाला प्राधान्य देईल, असे ते म्हणत असत . सर्व विश्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महती मान्य केली. संपूर्ण जगात त्यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी होते. कोलंबिया विश्वविद्यापीठाने त्यांना ज्ञानाचे प्रतीक म्हणून गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा मानवतेच्या कल्याणाचा विचार आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार व प्रचार जोमाने होत आहे. त्यांचे विचार आपण आचरणात आणावे त्यांनी या देशाला सर्वश्रेष्ठ संविधान दिले. त्यांच्या विचारांचा वारसा बार्टी पुढे नेत आहे असे प्रतिपादन धम्मज्योती गजभिये ,महासंचालक बार्टी पुणे यांनी व्यक्त केले .

डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी ,पुणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर १४ एप्रिल २०२१ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. या जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी धम्मज्योती गजभिये हे होते .ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकला.

तत्पूर्वी, जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त समाज कल्याण , महाराष्ट्र राज्य,धम्मज्योती गजभिये ,महासंचालक बार्टी पुणे, मा.उमेश घुले, निबंधक बार्टी पुणे, आदी उपस्थित होते.डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी ,पुणे येथील मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला धम्मज्योती गजभिये, महासंचालक बार्टी पुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उमेश घुले, उपायुक्त तथा निबंधक बार्टी पुणे, श्रीमती दीप्ती सूर्यवंशी, उप जिल्हाधिकारी तथा योजना विभाग प्रमुख रवींद्र कदम, उपायुक्त तथा जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती विभाग प्रमुख, श्रीमती स्वाती मोकाशी, लेखाधिकारी , व बार्टीतिल अधिकारी ,कर्मचारी उपस्थित होते .

या ऑनलाईन जयंती सोहळास उमेश घुले ,निबंधक बार्टी पुणे ,यांनी प्रास्ताविक करुन शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन सुमेध थोरात ,प्रकल्प व्यवस्थापक यांनी केले, तर ऑनलाईन जयंती सोहळ्याचे आभार नितीन सहारे ,प्रकल्प व्यवस्थापक यांनी मानले.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मानवतेच्या कल्याणाचा विचार आहे, वंचित घटकांना न्याय देण्यासाठी बार्टी काम करेल : धम्मज्योती गजभिये

● समीक्षा टाईम्स : प्रतिनिधी

पुणे : डॉ बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते होते. असा अपप्रचार करण्यात आला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील सर्वांसाठी काम केले. मी प्रथम माझ्या देशाला प्राधान्य देईल, असे ते म्हणत असत . सर्व विश्वाने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महती मान्य केली. संपूर्ण जगात त्यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी होते. कोलंबिया विश्वविद्यापीठाने त्यांना ज्ञानाचे प्रतीक म्हणून गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा मानवतेच्या कल्याणाचा विचार आहे. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रसार व प्रचार जोमाने होत आहे. त्यांचे विचार आपण आचरणात आणावे त्यांनी या देशाला सर्वश्रेष्ठ संविधान दिले. त्यांच्या विचारांचा वारसा बार्टी पुढे नेत आहे असे प्रतिपादन मा. धम्मज्योती गजभिये ,महासंचालक बार्टी पुणे यांनी व्यक्त केले . डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी .पुणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर १४ एप्रिल २०२१ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. या जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी मा.धम्मज्योती गजभिये हे होते . यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की,आपण लहान आहोत असे न समजता, कोणीही कमजोर नाही .आपण स्वतः पासुन बदल घडू शकतो. बार्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार पुढे नेत आहे. शिक्षण .शेती .पाणी. याविषयावर बार्टी संशोधन करेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे पुस्तकांत बंद असलेले विचार बार्टी पुढे नेईल. दलित शोषित पीडित उपेक्षित वंचित नव्हे तर सर्वांना न्याय देण्यासाठी बार्टी काम करत आहे..

"आजची परिस्थिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार". या विषयी ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत मा. उत्तम कांबळे यांनी ऑनलाइन पद्धतीने मार्गदर्शन केले. ते म्हणाले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काळाराम मंदिराचा सत्याग्रह केला. चवदार तळ्याचा सत्याग्रह केला. त्यांना आम्ही पण माणसे आहोत हे सांगायचे होते . त्यांच्यामुळेच देशाला राज्यघटना मिळाली .सामाजिक न्यायाचे हक्कदार झालो.या देशात ८० टक्के लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. ४०% लोक हे अल्प भुधारक आहेत . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्री असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नाला हात घातला होता. खोती आंदोलन. शेतीचा विकास करायचा असेल तर शेतकऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाकडे न्यावे लागेल .शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे म्हणून त्यांनी संकल्पना मांडली होती .

औद्योगिकरणाची गती वाढवावी लागेल. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खेडी सोडून शहराकडे जावे .असा मोलाचा संदेश दिला. डॉ .बाबासाहेब आंबेडकर जलसाक्षरतेचे जनक होते .या देशातील नद्याजोड प्रकल्प अमलात आला पाहिजे .धरणे बांधली पाहिजेत. पाणी लवाद. जलवाहतूक .ही संकल्पना त्यांनीच मांडली. शिक्षण नसेल तर माणूस गुलाम बनतो. हजारो वर्षांपासून शिक्षणापासून वंचित



असलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षण दिलेच पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. वंचित घटकातील मुलांना बार्टी उच्च शिक्षण देत आहे. हे गौरवास्पद असल्याचे उद्गार त्यांनी काढले. ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध पैलूवर प्रकाश टाकला.

तत्पूर्वी, जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास सामाजिक न्याय राज्यमंत्री मा. डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मा. डॉ. प्रशांत नारनवरे, आयुक्त समाज कल्याण , महाराष्ट्र राज्य.मा. धम्मज्योती गजभिये .महासंचालक बार्टी पुणे. मा.उमेश घुले. निबंधक बार्टी पुणे. आदी उपस्थित होते.

डॉ.. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी .पुणे येथील मुख्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला मा.धम्मज्योती गजभिये, महासंचालक बार्टी पुणे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मा उमेश घुले, उपायुक्त तथा निबंधक बार्टी पुणे, मा.श्रीमती दीपी सूर्यवंशी, उप जिल्हाधिकारी तथा योजना विभाग प्रमुख मा. रवींद्र कदम, उपायुक्त तथा जिल्हा जात वैधता प्रमाणपत्र पडताळणी समिती विभाग प्रमुख, मा. श्रीमती स्वाती मोकाशी, लेखाधिकारी , व बार्टीतिल अधिकारी .कर्मचारी उपस्थित होते .

ऑनलाइन जयंती महोत्सवात झूम मीटिंग द्वारे बार्टी फेसबुक पेजवर बार्टीतील अधिकारी-कर्मचारी , तालुका समन्वयक,राज्यातील सर्व समतादुत . सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर .यांनी ऑनलाइन पद्धतीने जॉईन होऊन या जयंती सोहळ्याचा लाभ घेतला .या ऑनलाईन जयंती सोहळास मा. उमेश घुले .निबंधक बार्टी पुणे .यांनी प्रास्ताविक व आजरुन शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन सुमेध थोरात ,प्रकल्प व्यवस्थापक यांनी केले. तर ऑनलाईन जयंती सोहळ्याचे आभार नितीन सहारे .प्रकल्प व्यवस्थापक यांनी मानले.....

# महात्मा जोतीराव फुले यांचे विचार कृतीत आणून वंचित दुर्लक्षितघटकांना आम्ही न्याय देऊ-धम्मज्योती गजभिये



■ पुणे

क्रांतिसूर्य महात्मा जोतीराव फुलेयांनी १जानेवारी १८४८साली पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. त्या काळात समाजव्यवस्थाचातुर्वण्य व्यवस्थेत विभागली होती. तेव्हा सावित्रीबाई फुले व महात्मा जोतीराव फुले यांनी शिक्षणाचे दारमुलींसाठी खुले केले. विधवा महिलांना त्यांनी आश्रय दिलाआणि समाजातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, कर्मकांड यांच्यावर त्यांनी प्रहार केला.असे प्रतिपादन बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी येथे केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी पुणे(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिकन्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था) यांच्या वतीने कोविड-१९च्या पार्श्वभूमीवर महात्मा जोतीराव फुले यांच्या जयंतीनिमित्त ऑनलाइन पद्धतीने जयंतीचे आयोजन काल बार्टी मुख्यालय पुणे येथे करण्यात आले. या ऑनलाईन जयंती सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी धम्मज्योती गजभिये बोलत होते.

भारतीय संविधानाचे निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांना गुरुस्थानी मानले. त्याचडॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी आधुनिक भारताला संविधान दिले. छत्रपती शिवाजी महाराजांनी विपरीत परिस्थितीत लोकांचे, खऱ्या अर्थाने बहुजनांचे राज्य याप्रमाणे स्वराज्य निर्माण केले. शिवरायांच्या समाधीचा शोध घेऊन शिवरायांची पहिली जयंती साजरी महात्मा फुले यांनी केली. महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी विचारांचे आहे व आधुनिक तंत्रज्ञानाचा सुयोग्य वापर करण्यात अग्रस्थानी आहेत . बार्टीच्या वतीने आम्ही महापुरुषांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करित असताना त्यांचे विचार कृतीत आणण्यासाठी प्रयत्नशील आहोत . तसेचवंचित घटकांना न्याय देऊ असेही धम्मज्योती गजभिये म्हणाले."आधुनिक भारतातील सामाजिक क्रांतीचे प्रणेते महात्मा जोतीराव फुले" या विषयावरपी. आर.सोनवणे,प्राध्यापक संगणक अभियांत्रिकी विभाग-ए आयटी पुणे हे मार्गदर्शन करतानाम्हणाले की, महात्मा जोतीरावफुलेयांनी सर्वप्रथमसमताप्रस्थापित करण्यासाठी काम केले. सामाजिकक्रांतीचे जनक महात्मा जोतीराव फुले हेच आहेत. अत्यंत कर्मठ अशा सनातनी परिस्थितीत आपल्या लेखणीने प्रहार केले व वंचित दुर्लक्षित समाजाला शिक्षणाचे प्रभावी अस्त्र देऊन, माणूस म्हणून जगण्याचा अधिकार देण्यासाठी प्रसंगी स्वतः व सावित्रीबाई फुले यांनी अवहेलना व तुच्छ वागणूक यांची तमा न बाळगता महान कार्य केले.

बार्टी ही संस्था थोर पुरुष यांच्या विचारांचे प्रचार व प्रसार करणारी संस्थाआहे. संविधानाने सामाजिक न्याय, समता, सामाजिक सुरक्षा, कर्तव्य,अधिकारबहालकेले आहेत. भारतीय संविधान मानव विकासाचा दस्तावेज आहे. खऱ्या अर्थाने आधुनिक भारताची आर्थिक, सामाजिक राजनैतिक प्रगती साध्य करायची असेल तर भारतीय संविधानानुसार प्रत्यक्ष अनुकरण करावे लागेल.असे मत व्यक्त करून त्यांनी महात्मा जोतीराव फुले यांच्या कार्याला उजाळा दिला.

लोकमत

# बाबासाहेबांनी मानवतेच्या कल्याणाचा विचार केला

## महासंचालक धम्मज्योती गजभिये : वंचित घटकांना न्याय देण्यासाठी बार्टीचे काम

लोकमत न्यूज नेटवर्क

**पिंपरी** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते होते, असा अपप्रचार करण्यात आला. परंतु, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील सर्वांसाठी काम केले. कोलंबिया विश्वविद्यापीठाने त्यांना ज्ञानाचे प्रतीक म्हणून गौरव केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार हा मानवतेच्या कल्याणाचा विचार आहे, असे प्रतिपादन बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेत (बार्टी) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजित कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी समाज कल्याण आयुक्त प्रशांत नारनवरे, धम्मज्योती गजभिये, उमेश घुले उपस्थित होते. बार्टीच्या मुख्यालयातही बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला महासंचालकांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. या वेळी उपजिल्हाधिकारी दीप्ती सूर्यवंशी, रवींद्र कदम, स्वाती मोकाशी यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. सुमेध थोरात यांनी सूत्रसंचालन केले. नितीन सहारे यांनी आभार मानले. निबंधक उमेश घुले यांनी प्रास्ताविक केले.

### शेती, शिक्षणावर बार्टी संशोधन करेल

गजभिये म्हणाले, बार्टी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा विचार पुढे नेत आहे. शिक्षण, शेती, पाणी याविषयावर संशोधन करेल. दलित, शोषित, पीडित उपेक्षित वंचित नव्हे, तर सर्वांना न्याय देण्यासाठी बार्टी काम करीत आहे. आजची परिस्थिती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार याविषयी ज्येष्ठ साहित्यिक, पत्रकार उत्तम कांबळे यांनी मार्गदर्शन केले. वंचित घटकांतील मुलांना बार्टी उच्च शिक्षण देत आहे, हे गौरवास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

तुम्ही बनावट पावती पुस्तक छापून पैसे कमविण्याचा धंदा थांबवाच, असे म्हणत पोलिसांना दमदाटी, धक्काबुक्की केली.

स्वादांमध्ये येत आहेत. डेअरी डे चे सह-संस्थापक एम एन जगन्नाथ

आहोत. पॉंडिचेरीमधील ३०,००० हून अधिक आऊटलेट्समध्येउपलब्ध आहेत.

अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. पीडित मुलीच्या ४२ वर्षीय वडिलांनी एमआयडीसी

सांगत असताना दोघांनी मिळून सिमेंटचा गट्टू डोक्यात मारून फिर्यादी यांना जखमी केले.

अभिवादन

धम्मज्योती गजभिये यांचे प्रतिपादन

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार मानव कल्याणाचा

नवराष्ट्र न्यूज नेटवर्क

**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ दलितांचे नेते होते,असा अपप्रचार करण्यात आला. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील सर्वासाठी काम केले, मी प्रथम माझ्या देशाला प्राधान्य देईल,असे ते म्हणत असत. सर्व विश्वाने डॉ. आंबेडकरांची महती मान्य केली. जगात त्यांची जयंती उत्साहाने साजरी होते. कोलंबिया विश्वविद्यापीठाने त्यांना ज्ञानाचे प्रतीक म्हणून गौरव केला आहे. डॉ. आंबेडकरांचा विचार हा मानवतेच्या कल्याणाचा विचार आहे,असे प्रतिपादन बार्टीचे महासंचालक धम्मज्योती गजभिये यांनी व्यक्त केले.



## वंचितना बार्टी देणार न्याय

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी, पुणे येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त कोरोना महामारीच्या पार्श्वभूमीवर (दि.१४) एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती ऑनलाइन पद्धतीने साजरी करण्यात आली. या जयंती सोहळयाच्या अध्यक्षस्थानी धम्मज्योती गजभिये हे होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे, उमेश घुले आदी उपस्थित होते. जयंती निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त पुणे जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ.आंबेडकर यांच्या पुतळयास सामाजिक न्याय राज्यमंत्री डॉ. विश्वजीत कदम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था बार्टी येथे डॉ. आंबेडकर यांच्या तैलचित्राला धम्मज्योती गजभिये यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

## औद्योगिकरणाची गती वाढवावी लागेल

कांबळे म्हणाले की,डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी काळा राम मंदिराचा सत्याग्रह केला. चवदार तळयाचा सत्याग्रह केला. त्यांना आम्ही पण माणसे आहोत हे सागायचे होते. त्यांच्यामुळेच देशाला राज्यघटना मिळाली ,सामाजिक न्यायाचे हक्कदार झालो. या देशात ८० टक्के लोक आजही शेतीवर अवलंबून आहेत. ४०% लोक हे अल्प भुधारक आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मजूर मंत्री असताना शेतकऱ्यांच्या प्रश्नाला हात घातला होता. खोती आंदोलन, शेतीचा विकास करायचा असेल तर शेतकऱ्यांना माहिती तंत्रज्ञानाकडे न्यावे लागेल. शेतीचे राष्ट्रीयीकरण करावे म्हणून त्यांनी संकल्पना मांडली होती. औद्योगिकरणाची गती वाढवावी लागेल,असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी खेडी सोडून शहराकडे जावे, असा मोलाचा संदेश दिला.

## नद्याजोड प्रकल्प अमलात आला पाहिजे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जलसाक्षरतेचे जनक होते. या देशातील नद्याजोड प्रकल्प अमलात आला पाहिजे.धरणे बांधली पाहिजेत, पाणी लवाद, जलवाहतूक, ही संकल्पना त्यांनीच मांडली. शिक्षण नसेल तर माणूस गुलाम बनतो. हजारो वर्षापासून शिक्षणापासून वंचित असलेल्या समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांना शिक्षण दिलेच पाहिजे असे त्यांचे ठाम मत होते. वंचित घटकातील मुलांना बार्टी उच्च शिक्षण देत आहे.